ebook

# ‘द किंग ऑफ मेलडी’ -

# ओ. पी. नय्यर

लेखक - अनंत पावसकर



# ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

## अनंत पावसकर

लिखित

# ‘द किंग ऑफ मेलडी..’

## - संगीतकार ‘ओ. पी. नय्यर’



**© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)**
anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**

**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**

**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**

**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !**

## ♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी)**
**(जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)**

अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष. ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).

इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना गुलमोहर नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० विविध अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीतील पहिलं ई-बुक बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत आशीर्वाद पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या चार ई-बुक्ससह इतर अनेक ई-बुक्स सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते म्युझिक प्लॅनेट ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

**(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)**

संगीतकार : 'ओ. पी. नय्यर' ♥ © लेखक : अनंत पावसकर ♥ 'ई-साहित्य प्रतिष्ठान' तर्फे प्रकाशित.

# ‘द किंग ऑफ मेलडी’
# ओ. पी. नय्यर

★ लेखक : अनंत पावसकर



‘अरोराजी, बहोत तकलीफ में हूँ.. आज पैसे मिलेंगे तो बडी मेहेरबानी होगी.. पाच ‘टेक’ झालेत वाजवून.. दोनशे रुपयांसाठी आणखी किती वेळा येऊ?.. प्लीज करा काहीतरी..’ सेटवर पडलेल्या वायर्स, प्रॉपर्टी आणि चमचमते कपडे घातलेल्या डान्सर्सच्या घोळक्यात मसरूफ असलेल्या अरोरांच्या मागे मागे, परेशान बाबू दाभोळकर (नावे बदलली आहेत.) नुसता दिनवाण्या चेहऱ्याने फिरत होता. पैशांसाठी अजिजी करत होता.. उद्दाम अरोराला फिकीरच नव्हती त्याची. डान्सरपैकी अमुक एकीची शिफ्ट संपताच ‘कुठे’ जायचं हे महत्त्वाचं होतं त्याला..

'अरे बाबू?.. तू यहाँ? शूटिंग के सेटपर क्यूँ रखड रहे हो भाई?' तडक् मागे वळून पाहिलं त्यानं. ओपीसाहेब आपलं नेहमीचं मिश्किल हास्य चेहऱ्यावर वागवत विचारत होते त्याला. मेहबूबचं रेकॉर्डिंग थिएटर सोडून हा तिथल्या मेहबूबच्या फिल्म शूटिंगच्या सेटवर कशाला झक मारतोय असं प्रश्नचिन्ह होतं, ओपी नय्यरजींच्या विचारण्यात. टच्कन आसवं आली बाबूच्या डोळ्यात. आवंढा गिळत आपल्या जवळच्या माणसाला कैफियत सांगावी तसं अडखळत आप-बीती सांगू लागला.. 'ओपीसाहेब.. हात टेकले आम्ही या प्रोड्युसरपुढे.. अहो आम्ही चोवीस व्हायोलिनवादकांनी त्यांच्या पाच गाण्याचे 'टेक' वाजवलेत, पण छदाम द्यायचं नाव नाही त्याचं! इथे शूटिंगसाठी पैसा उडताना डोळ्यांसमोर दिसतोय, पण आज, उद्या, परवा करता करता महिना उलटून गेलाय आमच्या पेमेंटसाठी.. पोरगी नायरला ॲडमीट आहे हो माझी! खूप निकड आहे.. म्हणून खेटा घालतोय..' बाबू रडायचाच काय तो बाकी होता. ओपीजी क्षणभर गंभीर झाले. कोटाच्या खिशात हात घालून पाचशे रूपये काढत बाबूच्या हातावर ठेवले आणि अरोरांकडे मोर्चा वळवला..

'अरोराजीऽऽ!!' ओपींचा आवाज तिथल्या सेटवर घुमताच हुजऱ्याने खांद्यात वाकत शहेनशाहपुढे पेश व्हावं तसा लोचट अरोरा ओपींपुढे उभा राहिला. पुढची पाचेक मिनिटे सेटवरची प्रत्येक व्यक्ती ओपींच्या चेहऱ्यावरचे बदलते रंग आणि अंगार ओकणारा आवाज ऐकत होते. तिथे स्क्रीप्ट नव्हतं की कुणाचं डायरेक्शन. पण नाट्य बरंच रंगलं की हो! अरोरा जागच्याजागी थिजला होता..

काय पण पध्दत? चित्रपटातली गाणी रेकॉर्ड करायला वादकांना बोलवायचं, पण त्या कामाचे पैसे-मानधन घ्यायला त्यांनी प्रोड्युसरच्या ऑफिसचे उंबरठे झिजवायचे? भिकाऱ्यांसारखे? आज काय तर, साहब बाहर गाँव गये है, उद्या काय तर अकाऊन्टंटकी तबीयत ठीक नही है.. माँ गुजर गयी है.. काय वाट्टेल ते सांगतात हे लोक. चुकून घरचा फोन नंबर मिळालाच तर तिकडे एकेक अजब उत्तर मिळणं हे तर ठरलेलंच. फंड, फायनान्स नाही तर कशाला करायची गाणी? वर्षानुवर्षे रियाज करून आपल्या वादनकलेत प्रावीण्य मिळवलेल्या ह्या वादकांनी पैश्यांसाठी निर्मात्यांकडे झुकायचं? चुकीची पध्दत होती ती. पूर्वापार चालत आलेली. असंतोष होता, पण कुणाची हिम्मत नव्हती निर्मात्यांपुढे बोलायची. ओपींनी सेटवरच त्या निर्मात्याला खडसावलं. सज्जड दम भरला. 'माझ्या गाण्यांपैकी प्रत्येकाचं पेमेंट दोन दिवसात क्लियर करा..' आणि त्या निर्मात्याचं पुढचं काम करायला साफ नकार देत 'वॉक-आऊट' केला ओपींनी. ओपीजींच्या सिंहगर्जनेमुळे भल्या-भल्या निर्मात्यांची पिवळी झाली. सर्व संगीतकारांनी मग त्यांचीच री ओढली. प्रकरणाला बराच गडद रंग चढला, पण दोन आठवड्यातच सर्वच्या-सर्व रेकॉर्डिंगला 'ऑन -द-स्पॉट' पेमेंट मिळू लागलं वादकांना. नव्या वादकांना हे तितकंसं माहीत नाहीय पण बुजुर्ग वादक, आजही हा सीन रंगवून-रंगवून सांगतात. आमच्या ओपींमुळे हे झालं असं अभिमानाने सांगतात. त्यांना मनापासून दुवा देतात. याचं फलित म्हणून की काय, सिनेसंगीतातल्या वादकांनी मिळून आपली स्वतःची अशी 'संघटना' बनवली.

देवाने आपल्याला गडगंज संपत्तीचं भरभरून दान दिलं नसलं तरी चांगली गाणी ऐकण्यासाठी दोन स्वच्छ कान

मात्र विधात्याने आपल्याला बहाल केले आहेत, होय की नाही? चांगली गाणी आपल्या मनात रुंजी घालतच असतात. आपली साथसंगत करत असतात. संगीतकार ओ. पी. नय्यर हे नाव उच्चारताक्षणी त्यांनी संगीतबध्द केलेली अनेक बेमिसाल गाणी आपल्या अंतश्चक्षुपुढे पिंगा घालायला लागतात. आज स्वप्नवत वाटणाऱ्या त्या गाण्यांच्या धुंदफुंद आठवणींची बारात डोळ्यांपुढून मिरवत जाते. मुंबईतल्या चाळीतली खोली सोडून लांब विरारला रहायला गेलो खरा पण मन कशातच रमेना. सगळ्या चांगल्या गोष्टींची नाळ जणू तुटल्यात जमा होती. 'मुंबईत नाट्य-साहित्य-संगीतसृष्टी एकवटलेली तर ह्या स्वप्ननगरीशी असलेलं नातं तोडून.. डायरेक्ट विरार?..' असं कित्येक मित्रांनी बोलूनही दाखवलं. विरारला रहायला गेल्याची सतत खंत वाटायची सुरुवातीला. ट्रेनमधली गर्दी! हाडं खिळखिळी होतील असा रोजचा प्रवास!.. पण चार-पाच दिवसातच इथलं जगणं सुसह्य होणार अशी जाणीव झाली. माझ्या भाग्याची गोष्ट अशी की, ओपी नय्यरजी विरारला आमच्या शेजारच्याच इमारतीत रहायला आले होते. (ते इथे दोनेक वर्षे राहिले) किती आनंदलोय म्हणून सांगू! दिवस सुरू व्हायचा तोच मुळी ओपींच्या दर्शनाने. मी ७.१४ची ट्रेन पकडायला घरातून निघायचो. योगायोगाने त्याचवेळी नय्यरसाहेब हातात शिसवी लाकडाचा जाड दंडुका घेऊन मॉर्निंग वॉकला निघालेले असायचे. 'गुड मॉर्निंग' करताच ते उजवा हात उंचावून मंद मंद हसायचे. जणू काही 'कसा आहेस?', 'मी मजेत आहे बरं का!' किंवा 'हॅव अ नाईस डे' असे सगळे भाव असायचे त्यांच्या त्या हात उंचावण्यात. ते हमखास एनर्जिटिक दिसायचे. टॉमेटोसारखा लालबूंद चेहरा, ताडमाड उंची, फिल्मी ऐट आणि बेफिकीर वृत्ती. खूप कडक शिस्तीचे वाटायचे. माझ्याच इमारतीतील पहिल्या मजल्यावर, विरारचे तत्कालीन सन्माननीय मुख्याधिकारी रहायचे. त्यांच्यामुळेच ओपीसाहेबांशी 'रुबरू' भेट झाली.. आणि नंतर थेट परिचय झाला. मी 'संगीत' क्षेत्राशी निगडीत आहे.. आणि मुख्य म्हणजे 'व्हीनस' या मातब्बर 'म्युझिक कंपनीमध्ये' अधिकारपदावर कार्यरत आहे म्हणता, आमच्यात पुढे-पुढे अगदी दिलखुलास गप्पा होऊन जिव्हाळयाचे संबंध निर्माण झाले. भेटी वाढू लागल्या. (कारण त्यांनी संगीत दिलेले 'निश्चय' (१९९२) आणि 'जिद' (१९९४) या चित्रपटांचे 'म्युझिक राईटस्' नुकतेच आमच्याकडे आले होते हे सुद्धा एक महत्त्वाचं कारण होतं बरं! मी 'सामना' या दैनिकामध्ये तुमची 'कव्हर-स्टोरी' करायचीय असं सांगताच, ते दिलखुलास हसले. त्या संध्याकाळी मैफल जमली. आमचे मुख्याधिकारी, ते आणि मी!.. ते दोन तास! या 'ग्रेट-भेटीमध्ये' मी एक गोष्ट अनुभवली. (लोकापवाद, गॉसिप.. गया तेल लगाने!!) ते बोलताना.. आपल्या गाण्यांबद्दल ते भरभरून बोलायचे पण या गप्पांमध्ये त्यांनी कुणाबद्दल चकार वाईट शब्द उच्चारायचे नाहीत. 'संगीत संयोजक.. सॅबी अंकल' यांसह अनेक दिग्गज वादक यांच्या आठवणी दिलखुलासपणे सांगायचे. त्या बोलण्याला कसलीही बोचरी किनार नसे, हे विशेष! आपण.. (घरातल्या काही कलहांमुळे म्हणा की आणखी काही कारणांनी ते इथे विरारला रहायला यावं लागलं होतं. असं ऐकलं होतं... पण.. त्यांचं आत्ताचं जीवन काहीसं बोचरं झालंय याची अजिबात खंत मात्र नसायची त्यांच्या वागण्यात किंवा बोलण्यात.)

सैगलचं वेड कुणाला नव्हतं? समस्त संगीतकारांपासून ते फिल्मइंडस्ट्रीत गायक म्हणून प्रवेशलेल्या प्रत्येकाने धुंद डोळ्यांनी, गळ्यांनी गौरीहर पुजला तो सैगलचाच. ओपीही त्याला अपवाद नव्हते. लाहोरला शनिवार दि. १६ जानेवारी १९२६ या दिवशी मदन गोपाल नय्यर व लक्ष्मी मदन नय्यर या दांपत्याला पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्यांनी त्याचं नाव 'ओंकार प्रसाद नय्यर' असं ठेवलं. ओपींना चार भाऊ आणि एक बहिण! तसं पहायला गेलं तर ओपींच्या घराण्याला कोणतीही सांगीतिक पार्श्वभूमी नव्हती. संपूर्ण घराणं उच्चविद्याविभूषित! मात्र ओपींना वेड होतं ते संगीताचं. त्यांचं मन सैगलची गाणी ऐकण्यात खूप रमायचं. असं वाचनात आलंय की, ओपींच्या जन्माच्या आधी त्यांच्या आईला हार्मोनियम ऐकण्याचे व वाजवण्याचे कडक डोहाळे लागले होते. हौसेनं 'हार्मोनियम' विकत आणला गेला होता. आता.. लाहोरमधल्या नय्यर यांच्या कर्मठ सनातनी घरात, आईला 'हार्मोनियम' शिकवायला मास्टरजी येऊ लागले. याचाच अर्थ असा की, ओपींवर त्यांच्या जन्माआधीपासूनच 'संगीतसुरांचे' गर्भसंस्कार झाले होते. ओपींना सैगलचं वेड होतंच, नंतर त्यांना ऐन बहारात येणाऱ्या 'न्यू थिएटर्सचं' अप्रूप वाटू लागलं! आर. सी. बोराल, के. एल. सैगल, पंकज मलिक, कानन देवी ही त्यांची जणू दैवतेच होती. के. एल. सैगल या नावाची प्रेरणा घेऊनच बहुदा नय्यरजींनी आपलं नाव ओ. पी. नय्यर असं लावायला सुरुवात केली असावी. वयाच्या अकराव्या वर्षी, म्हणजे सदतीस साली लाहोरच्या आकाशवाणीत लहान मुलांच्या कार्यक्रमात चमकणारे ओपी, शिकायचं म्हणून मॅट्रिक शिकले. इंटरपर्यंत मजल मारली पण त्यांचा खरा ओढा होता तो संगीताकडेच. सहज ऐकलेल्या लोकसंगीताला आणि भजनांना वेगवेगळ्या चाली लावण्यात ते तासन्तास रमायचे. आईने लहानपणी कौतुकाने आणलेल्या बाजापेटीनं ओंकारच्या बोटात सुरांचं ज्ञान ओतलं. लग्न तसं लवकरच झालेलं. सौ. मोहिनी नय्यर कविता करायच्या. 'प्रीतम आन मिलो..' या त्यांच्या कवितेला चाल लावून सी. एच. आत्मांकडून गाऊन घेतलं. अवघ्या एकोणीसाव्या वर्षी ओपी 'प्रीतम आन मिलो..' मुळे घरोघरी पोहोचला. रेडिओवर ते लागायचंच पण लोकांनी ते इराण्याच्या हॉटेलात एकीकडे ऑम्लेट-पाव किंवा चाय-ब्रून मस्का खात खात चवन्नी टाकून गाणी ऐकवणाऱ्या 'ज्यूक-बॉक्स' मध्ये ते पार रेकॉर्ड झिजून जाईपर्यंत ऐकलं असल्याचं बुजुर्ग मंडळी सांगतात. रेकॉर्डवर ओपींचा नामोल्लेख नव्हता, पण कस्तुरीचा सुगंध लपवता थोडाच येतो? नय्यरजींचं नाव हळुहळू सर्वतोमुखी झालं. सी.एच.आत्मा यांना रॉयल्टीच्या रूपात खोऱ्यानं पैसा मिळाला पण ओपींच्या कनवटीला लागू शकले ते केवळ चाळीस रूपयांचं मानधन. इतक्यात फाळणी झाली. ओपींनी संगीत क्षेत्रात काम करायला मिळावं म्हणून सरळ मुंबई गाठली.

इकडे सुप्रसिध्द निर्माते म्हणून नाव कमावलेल्या दलसुखभाई पंचोलींनी, राज कपूरने 'बरसात' (१९५१) साठी निवडलेल्या शंकर-जयकिशन या ताज्या दमाच्या संगीतकारांकडेच आपल्या 'नगिना' (१९५१) या नव्या सिनेमाच्या संगीताची जबाबदारी सोपवण्याचं ठरवलं. 'प्रीतम आन मिलो..' या गाण्यावर फिदा होऊन त्यांनी गायक सी. एच. आत्माचा शोध घेतला व त्याला आपल्या या चित्रपटात 'दिल बेकरार है, मेरा दिल..' हे गाणं गाण्याची संधी दिली. ज्या गाण्यामुळे आपल्याला हे काम मिळालंय त्या गाण्याचा संगीतकार कोण होता किंवा काय ते सी. एच.

आत्माने पंचोलीसाहेबांना सांगायला हवं होतं की नाही? आश्चर्य म्हणजे इतके दिवस त्यांच्या वा त्या ग्रुपच्या प्रत्येकाशी संपर्कात राहूनही त्याने 'प्रीतम आन मिलो..' चे संगीतकार म्हणून ओपींचा साधा उल्लेख करण्याचं सौजन्य दाखवलं नाही. ओपींच्या दुदैवाने रेकॉर्डवर त्यांचा नामोल्लेखही नव्हता. सिनेमा रीलिज झाला. नूतनचा हा सिनेमा हा बऱ्यापैकी गाजला. सी. एच. आत्माचं नाव झालं पण ओपींची झोळी फाटकीच राहिली. कुणीतरी या गाण्याचा कर्ता कोण आहे हे सांगितल्यावर पंचोली तीनताड उडालेच. यानंतर पंचोली, या 'ओ. पी. नय्यर' नामक व्यक्तीचा शोध घेऊ लागले. प्रत्येक वेळी हातात निराशाच आली. त्यांचं घर कुणाला ठाऊक नव्हतं. कसं असणार म्हणा! ओपीजींचं मुंबईत स्वतःचं घर नव्हतं. ते तेव्हा आपल्या कुटुंबासह कुठल्याशा हॉटेलात मुक्काम ठोकून होते. अचानक एके दिवशी कुठल्याशा सिनेमा थिएटरात त्यांची एकमेकाशी गाठ पडली. दलसुखभाई पंचोलींनी त्यांना दुसऱ्याच दिवशी तातडीने आपल्या ऑफिसमध्ये बोलावून घेतलं. शब्द दिला. करार केला. नासीर खान, श्यामा, ललिता पवार अशी स्टारकास्ट असलेल्या 'आसमान' (१९५२)चं संगीत ओपीकडे सोपवलं. ओपींनी संगीत दिलेला हा पहिला चित्रपट. यातलं 'देखो जादूभरे मोरे नैन..' हे गीता दत्तने गायलेलं गाणं रसिकांना आवडलं होतं. नय्यरजींनी ढोर मेहनत केली होती पण तो सिनेमा सपशेल आपटला. ओपी या धक्क्यातून थोडेसे सावरताहेत तोच काही दिवसानंतर प्रदर्शित झाला.. प्यारेलाल संतोषी यांच्या 'छम छमा छम' (१९५२)! यात 'जरा सामने तो आ, आँख मिला..' व 'ऐ दिल ऐ दीवाने..' अशी काही उल्लेखनीय गाणी असुन सुद्धा साफ कोसळला. मोहन पिक्चर्सचा आधीचा 'शिनशिनाकी बुबलाबू' (१९५२) सी. रामचंद्रजींच्या संगीताने गाजवला होता तरी दिग्दर्शक प्यारेभाई संतोषीजींनी 'छम छमा छम' हा केवळ किशोरचा सिनेमा आहे म्हणून नव्या दमाच्या ओपींकडे सोपवला होता. पण हाय रे किस्मत! तोही 'फ्लॉप' व्हावा ना? गुरुदत्त आणि देव आनंद 'प्रभात'मधले जुने दोस्त! 'अफसर' (१९५०) व्दारे देव आनंदने आपलं 'नवकेतन' बॅनर सुरू केलं होतं, पण या सिनेमाची तिकिटबारीवर डाळ शिजली नाही. अपयशाने नाउमेद झाला तर तो देव आनंद कसला? मिळेल त्या सिनेमात काम करून पैसा मिळवायचा हे धोरण ठेऊन त्याने धडाधड आठ सिनेमे साईन केले. या सिनेमातून अभिनय करून जमवलेली पुंजी त्याने बलराज सहानींच्या 'बाजी'च्या स्क्रीप्टवर लावली. निर्माता चेतन आनंद! आता त्याने आपल्या दोस्ताला, गुरुदत्तला डायरेक्शन करायची संधी दिली. देव हीरो.. संगीत सचिनदेव बर्मन! सुदैवाने 'बाजी' (१९५३) गाजला. याच दरम्यान गुरुदत्तला हीरो म्हणून चमकायचं खूळ लागलं की काय; त्याने 'बाज' (१९५३) मध्ये आपली प्रतिभा पणाला लावली. स्वतःच हीरो आणि स्वतःच दिग्दर्शक! संगीताचं काम त्याने मोठ्या आशेनं ओपी नय्यर कडे सोपवलं. पण दुदैवाने गुरुदत्तचं गणित साफ चुकलं. हीरो म्हणून स्वतःच्याच डोक्यावर मुंडावळ्या बांधणारा गुरुदत्त ढेपाळला. ओपींनी केलेले हे चित्रपट ओळीने 'फ्लॉप' झाले. लोकांनी त्या सिनेमांना धोबीपछाड देऊन उताणं पाडलं आणि आसमान दाखवलं. शेवटी नशीब !! दलसुखभाई पंचोलींचा 'आसमान' हा सिनेमा आपटला होता खरा, पण त्यातलं एक गाणं अमीन सायानीच्या बिनाका गीत मालेत चक्क अनेक वर्षे सिग्नेचर-ट्यून म्हणून वाजत होतं. गुरुदत्त 'बाज'च्या अपयशातून बरंच काही शिकला परंतु शेवटी व्हायचं तेच झालं. एकामागोमाग एक असे तीन चित्रपट तोंडघशी

पडल्यामुळे त्याचा परिणाम थेट ओपींवर झाला. खूप वाईट दिवस आले ओपींचे. मुंबईत राहतं घर नसल्यामुळे हॉटेलात कुटुंब-कबिला होता. तिथल्या थकबाकीचा आकडा फुगत चालला होता. हॉटेल मालक सॉलिड चिडला. सामान फेकायचीही नौबत येणार होती. अतिशय नर्व्हस होऊन ओपी आपल्या गावी परतण्याच्या विचारात होते. सुप्रसिध्द 'कारदार' फिल्मच्या कपूरसाहेबांकडे गेले. त्यांची भेट घेऊन त्यांना आपली कैफियत सांगितली. तीन हजार गुरुदत्तकडे थकलेत ते तरी मिळवून द्या अशी विनवणी केली. कपूरसाहेब ओपींना तिथून डायरेक्ट गुरुदत्तकडे घेऊन गेले. गुरुदत्त तर परेशानीत होता. तो तर आपल्याच नशिबाला दोष देत बसलेला. गुरुदत्त भेटताच कपूरसाहेबांनी त्याला वेगळाच प्रश्न केला.. 'हा ओपी नय्यर, म्युझिक-डायरेक्टर म्हणून कसा आहे रे?' गुरुदत्त वैतागतच म्हणाला.. 'तो चांगला आहे यार.. पण इथे 'बाज'मुळे माझी हाडं खिळखिळी झालीत..' कपूरसाहेब त्याला मध्येच थांबवत म्हणाले.. 'पुढच्या पिक्चरसाठी साईन कर त्याला. आज अडचणीत आहे तो. दे काहीतरी ॲडव्हान्स!..' गुरुदत्त हादरलेच. 'पुढचं पिक्चर? अरे वाट लागलीय माझी..' कपूरसाहेब समजावत म्हणाले.. 'चल.. मी करतो त्याचं डिस्ट्रीब्युशन.. ओपीला संगीत द्यायला लावूया..' ओ. पी. नय्यरजींना आत बोलविण्यात आलं. ओपी येताच गप्पांमध्ये वेळ न दवडता गुरुदत्त सरळ आतल्या खोलीत गेले आणि नकद हजार रुपयांची चळत घेऊन बाहेर आले. तिथल्या तिथे करार झाला, नव्या चित्रपटाचा! ओपी तिथून बाहेर पडले ते नव्या सिनेमाच्या संगीताची साईनिंग अमाऊन्ट घेऊनच. 'आरपार'! निर्माता-दिग्दर्शक गुरुदत्त! शकिला, श्यामा, गुरुदत्त अभिनीत 'आरपार'! मिळालेल्या रकमेच्या कुबड्यांवर ओपींनी घराची तात्पुरती विस्कटलेली घडी व्यवस्थित केली. 'आरपार' (१९५४) ने काय धमाल उडवली ते तुम्हाला माहीतच आहे!

लाहोरला असताना तिथलं एक 'बँडपथक' अगदी कुशलतेनं हाताळणारा 'सॅबेस्टीयन डिसोजा' (जन्म :२९ जानेवारी, १९०६- मृत्यू ९ मार्च, १९९८) ओपींचा चांगलाच दोस्त झालेला. योगायोगाने 'संगीत' हे ओपी यांचं आवडतं क्षेत्र आणि जिवाभावाचा दोस्त मिळाला तोही त्याच क्षेत्रातला. मग काय! तरुण ओंकार 'सॅबी'यांच्या लाहोरमधील वास्तव्यात त्यांच्या सतत सहवासात राहिला. बरंच काही शिकायलाही मिळालं. 'कनीज' (१९४९) हा निर्माता/दिग्दर्शक कृष्णकुमार यांचा एक महत्त्वाकांक्षी चित्रपट होता! श्याम, मुनव्वर सुल्ताना अशी स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाचे गीतकार होते हंसराज बहलजी, तर संगीतकार होते सन्मा. 'गुलाम हैदर' आणि 'हंसराज बहल'! त्यांनी आपला 'ड्रीम-प्रोजेक्ट' असलेला 'कनीज' (१९४९) चित्रपट पूर्ण होताच त्याच्या पार्श्वसंगीतासाठी तारखा मिळवायला ते संगीतकार गुलाम हैदरजींकडे गेले. परंतु आपल्या व्यस्त दिनचर्यमुळे त्रस्त झाल्याने गुलाम हैदरजींनी.. चित्रपटाच्या पार्श्वसंगीताची जबाबदारी कुणा योग्य संगीतकाराकडे सोपवावी असं अगदी नम्रपणे सांगितलेलं. कृष्णकुमार यांच्या नजरेत पोरगेलासा परंतु 'टॅलेंट' नसानसात भरलेला तरुण होतकरू 'ओपी' होताच. त्यांनी आपल्या 'कनीज' (१९४९) या 'ड्रीम-प्रोजेक्टच्या' पार्श्वसंगीताची जबाबदारी चक्क ओपींवर बिनधास्त सोपवली. चित्रपटाचं पार्श्वसंगीत देणं हे खायचं काम नाही, महाराजा! एकेक 'सीन', त्या सिनेमातली एकेक 'सिच्युएशन' पार्श्वसंगीत देत जिवंत करण्यासाठी ढोर मेहनत लागते. आपलं कसब पणाला लावावं लागतं, हे ओपीजींना पूर्णतः माहीत होतं. अर्थात 'न्यू

थिएटर्सच्या' चित्रपटांमुळे त्यांना हे बाळकडू मिळालं होतं. त्यांनी ते 'चॅलेंज' बिनधास्त स्वीकारलं! आपण आपल्या संगीताविष्काराने मेहनतपूर्वक अलंकृत केलेली आपली एक कलाकृती, कृष्णकुमारजींनी.. केवळ पार्श्वसंगीत करायचं म्हणून.. एका नवख्या संगीतकाराकडे सोपवल्याचं ऐकून सन्मा. गुलाम हैदरजी काहीसे नाराज झाले होते. त्या सत्वपरिक्षेच्या क्षणी ओपीजींना क्षणार्धात आठवला होता तो त्यांचा दोस्त.. 'सॅबी भाई'! त्याच्या 'म्युझिक-बँडचा' तो भलामोठा वाद्यवृंद हाताळण्याचं त्याचं ते कसब, प्रसंगानुरूप संगीत संयोजन, हजरजबाबीपणा..! बस्स! आपला हाच दोस्त हे शिवधनुष्य लीलया पेलू शकेल याची त्यांना पूर्णतः खात्री होती! विश्वास होता!. मग काय! ओपीजींनी त्यांना लागलीच पाचारण केलं. कायमसाठी! ('सॅबी अंकल' - हे मुळचे गोव्याचे! बरं!) 'इथल्या संगीतकारांच्या काही अरेंजर्समध्ये ग्रुपबाजीची कीड लागल्यामुळे शेवटी कंटाळून, मीच सॅबीभाईला इकडे पाचारण केलं..' असं ओपींनी मुलाखतीत अगदी आवर्जून सांगितलेलं. सॅबी अंकल किती जिनियस होते.. पहा! ओपीजींनी आपला दोस्त 'सॅबी भाई' यांना आपल्या स्वतःच्या संगीत दिग्दर्शनातील 'संगीत संयोजक' या अत्यंत महत्त्वपूर्ण व जबाबदरीच्या कामासाठी अनुबंधित करताना.. कोणत्याही अटी व शर्ती घातल्या नाहीत. 'तू संगीत संयोजक म्हणून फक्त माझ्याकडेच काम करशील..' अशी जाचक, आप-मतलबी अशी कपाळकरंटेपणाची अट घातली नव्हती. (कडक सॅल्युट..! आपल्या ओपीसाहेबांना!) हेच पहा ना! सॅबी अंकल ओ.पी. नय्यरजींकडे कार्यरत असतानाच.. सलील चौधरीजी, शंकर-जयकिशनजींच्या कॅम्पमध्येही संगीत-संयोजन करायचे. तीन वेगवेगळ्या संगीतकारांची स्टाईल तर चक्क तीन टोकाची. ते काम सॅबी अंकल कसं काय सांभाळू शकायचे परमेश्वर जाणे! पण ह्या सर्वच कॅम्पमध्ये सॅबी अंकल चांगलेच नांदले, हे मात्र तितकंच खरं!) 'कनीज'चं पार्श्वसंगीत बनताना निर्माता/दिग्दर्शक कृष्णकुमारजी स्टुडिओत हजर असत. एकेक बाब निरखत असत. आपलेपणाने काही सूचना सुद्धा देत असत. प्रॉडक्शन टीमने, त्या सर्वांची चांगलीच बडदास्त ठेवली होती. आणि... 'कनीज' पूर्ण झाला! कृष्णकुमारजी पार्श्वसंगीताबाबतीत तर खूपच समाधानी होते. त्यांनी ओपींची पाठ थोपटली. सॅबी यांच्यासह संपूर्ण टीमचं, तोंड भरून कौतुक केलं. ओपींचं हे काम, गुलाम हैदरजींना कधी सांगतो. संपूर्ण सिनेमा कधी दाखवतो असं त्यांना झालेलं. त्यांनी गुलाम हैदरजी यांची भेट घेऊन संपूर्ण चित्रपट पहायला येण्याची विनंती केली. त्यांना ही उत्सुकता होतीच! ते आले.. त्यांनी संपूर्ण सिनेमा शांतपणे पाहिला. आणि ते उठले. सरळ ओपींकडे जात त्यांना अलिंगन दिलं. कौतुकाने पाठही थोपटली. म्हणाले.. 'बहोत खूब..!' आणि कृष्णकुमारजींकडे वळून म्हणाले.. 'बहोत होनहार लडका है यह.. बहोत तरक्की करेगा देखना! ये लंबी रेस का घोडा है!!..' विशेष हे की 'कनीज' (१९४९) हा चित्रपट सुपरहिट झाला होता. गाणीही गाजली होती. संगीतकार गुलाम हैदरजी (जन्म : १९०८, मृत्यू : ९ नोव्हेंबर, १९५३) यांच्याबद्दल सांगायचं तर ते एक जिनियस संगीतकार होते. गाण्यांच्या चाली बांधताना हिन्दुस्थानी रागदारी बरोबरच पंजाबी संगीताचंही त्यात बेमालूम मिश्रण करायचे. ओपींना त्यांच्याबद्दल अत्यंत आदर होता. सन्मा. लतादीदी, महंमद रफी, नूर जहाँ त्यांना गुरुस्थानी मानत. १९४७ च्या फाळणीनंतर गुलाम हैदरजी पाकिस्तानात निघून गेले. असो!

तुम्ही संगीतकार ओपीजी, शंकर-जयकिशनजी तसंच सलील चौधरीजी यांच्या एखाद्या गाण्यात, त्या गाण्याच्या चालीला अगदी चपखलपणे फीट होणारा संगीताविष्कार नक्कीच अनुभवला असेल ना! तर.. इथे नेमकं काय असतं ? तर.. त्या गाण्याला समांतर जाणारी, तसंच त्या चालीला समर्पक होईल असा 'व्हायोलीन, चेलो, पियानो, स्पॅनिश गिटार, ऑर्गनसह साकारलेला एक मस्त वाद्यमेळाचा आविष्कार आकाराला आणलेला असतो. यालाच आपल्या संगीतसंयोजनाच्या भाषेत 'काऊंटर मेलडी' म्हणतात! या बाबतीत 'सॅबी अंकल' यांना, 'बॉलिवूड' संगीत क्षेत्रात 'पायोनियर' मानतात ते उगीच नाही! 'सॅबी अंकल' इथे व्यवस्थित रूळल्यावर ते ओपीजींचे ते 'म्युझिक अरेंजर' झाले. ओपी फक्त हार्मोनियमवर आपल्या गाण्याची कन्सेप्ट सॅबीला सफाईदारपणे समजावायचे. मधलं म्युझिक कोणत्या प्रकारचं असायला हवं हे सुचवायचे. सतार, सरोद, मेंडोलिन, तारशहनाई, संतूर, बासरी, सॅक्सोफोन इत्यादी पिसेस कुठे हवेत ते सांगायचे. सॅबी नंतर त्या संकल्पनेला सुबक विस्तार देत. वादकांत कोण असायचं माहीत आहे ? पं. रामनारायणजी (सारंगी), गुडी सखाई (ॲकॉर्डियन), पं. हरिप्रसाद चौरसिया (बासरी), पं. शिवकुमार शर्मा (संतूर), मनोहारी सिंह (सॅक्सोफोन-इंग्लिश फ्यूट), जी.एस.कोहली (ढोलक-नाल), सुमंतराज (बासरी) आणि रईस खाँ (सतार)! सॅबी अंकल ह्या दिग्गज वादकांच्या योगदानाने गाण्याला अलंकृत करायचे. एकेक आविष्कार म्हणजे बावनकशी सोनं! 'आरपार' (१९५४) ने ओपींना तारलं. सगळीच्या सगळी गाणी सुपरहिट झाली. 'आरपार' (१९५४) चित्रपटातील गाण्यांचा अभ्यास केला तर, ओ. पी. नय्यर हेच आद्य 'फ्युजनिस्ट' असावेत असं म्हणायला हरकत नाही. इथे त्यांनी देशी व विदेशी संगीताचे बेमालूम मिश्रण करून हिंदी चित्रपटसंगीतात एक नवी शैली जन्माला घातली, यात शंकाच नाही. विदेशी संगीताचा प्रभाव असूनही, ती सर्वच गाणी अस्सल भारतीय वाटतात, हे विशेष! असं म्हणतात, की त्या सालात प्रदर्शित झालेल्या गाण्यांना कंटाळून संगीत रसिकांनी ओपी यांच्या गाण्यांचं जबरदस्त स्वागत केलं. गीता दत्त यांची बंगाली रसगुल्ल्याची मिठास, शमशाद बेगम यांचा पंजाबी जोश याचा कौशल्यपूर्ण वापर करत ओपींनी 'आरपार' ची गाणी सजवली होती. 'कभी आर कभी पार लागा तीर-ए-नजर..' या शीर्षकगीतात शमशाद बेगम! 'हूँ अभी मैं जवाँ ऐ दिल..', 'ये लो मैं हारी पिया..', 'जा जा बेवफा.', 'सून सून जालिमा..' या गाण्यातली गीता दत्त! व्वा! ओपी स्पष्ट सांगतात.. 'गुरुदत्तने ही गाणी करण्याआधी 'बिंग क्रॉस्बी'च्या अनेक रेकॉर्डस् माझ्या पुढ्यात आणून टाकल्या होत्या. या रेकॉर्डस्मधल्या उडत्या गाण्यांच्या चाली ऐक आणि तशाच प्रकारचं झिंग येणारं संगीत मला हवंय..' असं निक्षून सांगितलेलं. शायर-गीतकार मजरूह सुल्तानपुरीजी होतेच मदतीला. ओपींनी चाली 'डायरेक्ट' नाही चोरल्या. (हा मान भप्पी वगैरेंकडे जातो म्हणे!) त्यातलं चलन घेतलं. तो बाज उचलला. गाण्यात अधोरेखित करता येतील अशा जागा शोधल्या. झिंग पकडली. सिनेसंगीतातल्या ह्या झकास कामगिरीमुळे ओपींचं नाव यशाची बुलंदी गाठायला झेपावू लागलं. 'ते आमचं टीमवर्क होतं.. या सिनेमामुळे, मानो मेरी दुनियाही बदल गयी..' असं ओपी नम्रपणे म्हणाले. या पुण्याईवरच ओपींना 'कारदार' प्रॉडक्शन्सचा 'बाप रे बाप' (१९५५) मिळाला. किशोरसारखा गायकनट हे पुन्हा एकदा चॅलेन्ज म्हणून सामोरं आलं. किशोरने नुकतंच सुधीर फडकेजींच्या 'पहली

तारीख' (१९५४) मध्ये 'दिन है सुहाना आज पहली तारीख है..' असलं धम्माल गीत गाऊन सैगल-स्टाईलच्या बेड्या झुगारल्याचं सिध्द केलं होतं. ओपींनी कंबर कसली. 'पिया पिया पिया मोरा जिया पुकारे..' हे आशाताईंबरोबरचं फर्मास युगलगीत आकाराला आलं. 'यॉडलिंग' करणारा किशोर ओपीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचणारा ठरला. आणि तो घोड्यांच्या टापांच्या आवाजासारखा ठेका! बाप रे! (माझं व्यक्तिगत मत सांगायचं तर, 'यॉडलिंग' या प्रकारातील, 'पिया पिया पिया, मेरा..' हेच पहिलं-वहिलं 'यॉडलिंग' गीत असावं! नंतर भले किशोरकुमार व इव्हन महंमद रफी आणि चक्क आशाताईंच्या आवाजातील 'यॉडलिंग' गीते आली असतील. 'पिया पिया पिया, मेरा..' हेच पायोनियर गीत असावं, नाही का?)

ओपींवर बालपणापासूनच 'न्यू थिएटर्स' चा प्रभाव होताच. पंकज मलिक यांच्या 'डॉक्टर' (१९४१) या सिनेमातलं 'चले पवन की चाल..' हे टांग्यावरील गाणं तर त्यांच्या खूपच आवडीचं होतं. (नौशादजींनी आपल्या 'अनमोल घडी' (१९४६), 'दीदार' (१९५१), 'उडन खटोला' (१९५५) ही शैली आणली होतीच की!) ओपींनी काही काळात 'नया दौर' (१९५७), 'तुमसा नही देखा' (१९५७), 'हावडा ब्रिज' (१९५८) अशाच प्रकारची 'टांग्यावरील गाणी' केली. या शैलीत अनेक संगीतकारांनी आपापली गाणी केली असली, तरी ओपींच्या ठेक्यांचं एक वेगळेपण होतं. नंतरच्या काळात, ओपींच्या चित्रपटांतील गाण्यांमध्ये, घोडागाडीवरचं एखादं तरी गाणं असायचंच! लोक गंमतीने म्हणत की, आपल्या ओपींमुळेच, टांगेवाल्यांच्या सवारीचा भाव वधारला! ओपींची यशस्वी दौड याच टप्प्यावर सुरू झाली. गज़ल, शास्त्रीय संगीत, टप्पा, ठुमरी, दादरा, लोकसंगीत अशा टप्प्याने सुरू झालेलं वर्तुळ ओपीने आपला हा नवा बाज देऊन पूर्ण केलं. तो काळ चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ होता. चित्रपटातलं संगीत चढत्या भाजणीने उत्तुंग झेप घेऊ लागलं होतं. ओपींचं नशीब जोरावर होतं. रायचंदजी बोराल, अनिल विश्वास, नौशाद, सचिनदा, मदन मोहन ते सी.रामचंद्रजी अशा दिग्गजांनी दिलेल्या 'क्लास' गाण्यांच्या बरोबरीनं ओपीच्या स्वतःच्या अशा या नवीन प्रकारच्या स्टाईलला लोकांनी लगेचच आपलंसं केलं होतं. हिन्दी सिनेसंगीतात सी. रामचंद्रजींनीच 'रॉक अँड रोल' आणि वेस्टर्न फील असलेली गाणी आणली हे खरंय. (इथे आठवतंय सी. रामचंद्रजींनी संगीतबध्द केलेलं एक धम्माल गाणं. फिल्मीस्तानच्या 'शहनाई' (१९४७) या रेहाना, इंदुमती, किशोरकुमार, दुलारी अभिनीत सिनेमात 'आना मेरी जान, मेरी जान, संडे के संडे..' हे अण्णांनी मीना कपूर, शमशादसह गायलेलं गाणं किती मस्त होतं नाही? 'एन- २६९६३' या क्रमांकाची ही '७८ आर.पी.एम.'वाली जुनी रेकॉर्ड माझ्या संग्रहात होती.) पण माझ्या मते, ती होती नुसती फोडणी. या फोडणीबरोबरच वेस्टर्न आणि हिन्दुस्थानी लोकसंगीत प्रकाराला बेमालूमपणे एकत्रित आणण्याची किमया साधली असेल ती ओपीनेच. 'सून सून जालिमा..' (आरपार) तुम्ही बऱ्याचदा ऐकलं असेल ना? गाण्याचा मुखडा थेट बिंग क्रोस्बीच्या 'सिंग सिंग!.. अ साँग विथ मी..' वरून सहीसही उचलला आहे, पण ओपींच्या संगीतात मुखड्याची गाडी अंतऱ्यावर येताच त्यातला पंजाबी ठेका गाण्याला अधिकच खुलवतो. शंकर-जयकिशनजींनी याच मुखड्याला घासून-पुसून लख्ख करत 'अनाडी' (१९५९) मध्ये 'बन के पंछी गाए प्यार का तराना..' या गाण्यासाठी वापरलं असल्याचं

वाचनात आलं आहे. ठेका बदलल्यामुळे ते चटकन लक्षात येत नाही इतकंच. 'सम संडे मॉर्निंग..' या सुपरहिट झालेल्या गाण्यातलं 'हमिंग' (गुणगुणणं) 'उधर तुम हँसी हो..' (मिस्टर अॅण्ड मिसेस ५५) या गाण्यासाठी बेमालुमपणे वापरलं असलं तरी गाण्याला दिलेली ओपी 'ट्रीटमेंट' बाजी मारून जाते. 'हुजुर-ए-आला, गर हो इजाजत..' (ये रात फिर न आएगी) या गाण्याची सुरूवात किती संथ वाटते. तो संथपणा आपल्यावर खुमारीचे पाश आवळतोय तोच 'तुम्हारी अदाओं पे मरते है हम..' या क्रॉसवर ठेका पूर्णपणे बदलून जात त्याला टाळ्यांची साथ येताच आपण पसंतीची उत्स्फूर्त दाद दिल्याशिवाय राहत नाही. ओपीने दिलेल्या सर्वच उडत्या चाली श्रोत्यांच्या पसंतीस उतरल्या पण ओपीचा हा लाडका इलाका कोणत्याही वळणावर रोंबा-सोंबा किंवा विकृतीकडे कधीच वळला नाही. 'नया अंदाज' (१९५६) मध्ये किशोरकुमार व शमशाद यांचं मस्त युगलगीत आहे.. 'मेरी निंदों में तुम..' तुफान लोकप्रिय झालं होतं. गाणं छान आहे पण, मीनाकुमारीला तो आवाज अजिबात शोभत नाही असं अनेकांचं मत होतं. ओपीजींनी सांगितलं.. 'आम्ही गाणं रेकॉर्ड करून झाल्यावर, नंतर ते कुणावर 'शूट' होणार आहे हे अजिबात माहीत नसतं.. गाना कैसा लगा? वो बोलो..!' अशाच गप्पा मारताना त्यांना कुणीतरी 'ओपी यांच्या संगीतातील आशाताईंचं योगदान!' या विषयावर छेडलेलं. 'आशाजी की आवाज में जबरदस्त दम था, वो संगीत को समर्पित थी.. और वो अपना गाना सजाना पूरी तरहा जानती थी! इसलिए उनको सामने रख के मैने जो गाने बनाए, वो सभी गाने हिट हुए..!'

निर्माता/दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांचा 'नया दौर' (१९५७) खूपच गाजला. गाणी खूपच गाजली म्हणता.. चोप्रासाहेबांनी ओपींकडे, स्वतःची तारीफ करत विचारले.. 'क्यूं ओपीजी, नया दौर कैसा लगा..' त्यावर ओपी शांतपणे म्हणाले.. 'नया दौर तो नही दिखा, मगर नय्यर दौर जरूर दिखा..' बी. आर. चोप्रा नाराज झाले की काय! त्यांनी ओपींना त्यानंतर संगीतकार म्हणून कधीच करारबद्ध केलं नाही. ओपी साहेब हट्टी म्हणा, आग्रही म्हणा किंवा विक्षिप्त याविषयी अनेक बुजुर्ग लेखकांनी लिहिलेलं वाचनात आलं. कोणत्या तरी संस्थेकडून त्यांचा गौरव करत असताना एक सुवर्णपदक दिलं जाणार होतं. त्याकाळात ओपी साहेब काहीसे आर्थिक विवंचनेत होते म्हणता.. सदर पुरस्कार रोख स्वरूपात मिळायची शक्यता आहे का? असं पुरस्कर्त्या संस्थेकडे स्पष्टपणे विचारलं होतं. त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. ओपींना ते पटलं नाही. ते काहीच बोलले नाहीत.. पण ते 'सुवर्णपदक' मिळाल्यानंतर दुस-याच दिवशी त्यांनी ते पदक आपल्या घरकाम करणाऱ्या बाईला बक्षिस म्हणून देऊन टाकलं. निषेध म्हणून! आणखी एक किस्सा सांगायचा तर त्यांच्या टीममधला एक वादक रेकॉर्डिंगला उशिरा आला. ओपींनी त्याला, आपल्या मनगटी घड्याळात पाहत सहजच विचारलं..'काय रे! किती वाजले? इथे सगळे खोळंबलेत तुझ्यासाठी..!' त्याने साधं 'सॉरी!..' म्हणायचं ना? पण तो तिरसटपणे म्हणाला.. 'साहेब, माझ्याकडे तुमच्यासारखं घड्याळ नाही, म्हणता उशीर होणारच ना!' ओपी आपल्या टीममधल्या प्रत्येकाला आपला मानत. त्यांनी काय करावं? ते उठले.. आणि आपल्या मनगटावरचं महागडं घड्याळ काढून त्याच्या मनगटावर बांधलं. त्या वादकाची

काय हालत झाली असेल ते त्यालाच ठाऊक. ओपी साहेब अतिशय हट्टी/ आग्रही किंवा विक्षिप्त असल्याचं भले ज्येष्ठ लेखकांच्या लेखातून आलं असेल पण ते मनाने खूप हळवे, संवेदनशील तसेच दिलदारही होते. त्यांच्यातील स्पष्टवक्तेपणा काही लोकांना त्रासदायक वाटायचा.. हे 'मनोहारी दादांनी' अनेकदा गप्पांमधून मला सांगितलं होतं. एक विचारतोय! जर ओपीसाहेब मनाने इतके दिलदार होते, तर 'शंकर-जयकिशन' यांच्याकडील 'रेकॉर्डिंगला' जास्त वेळ देत, आपल्या 'रेकॉर्डिंगला' मात्र केवळ अर्धा तास उशिरा आलेल्या, 'महंमद रफीसाहेबांना' परत त्यांच्यावर लागलीच बहिष्कार का बरं घातला असेल? हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीत आहे! (महेद्र कपूरजी, म्हणजे.. आमचे खास 'पापाजी' बरं! यांच्या सोबतच्या अनेक भेटीगाठीत मी त्यांना यावर बोलतं करायचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांनी यावर भाष्य करण टाळलं. एवढंच नव्हे तर आपल्या मराठी चित्रपटसृष्टीत, दादा कोंडके यांच्याकडे 'व्यवस्थित ट्युनिंग' असलेल्या 'जयवंत कुलकर्णी' यांना दादा कोंडके कॅम्पमधून पुढे का नाकारलं गेलं? यावरही त्यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नव्हती. असो! चलता है!)



आमच्या व्हीनस कंपनीच्या जुहू येथील.. 'ब्ल्यू-डायमंड स्टुडिओ' मध्ये अनू मलिक, जतीन-ललित यांच्या रेकॉर्डिंगच्या निमित्ताने, त्यांचे 'म्युझिक-अरेंजर' म्हणून सन्मा. मनोहारीदादा नेहमी येत असत. ते भले पंचमदांच्या 'कॅम्पचे'! परंतु, ओपीसह अनेक दिग्गज संगीतकारांकडे त्यांनी सॅक्सोफोन, सुप्रानो, इंग्लिश फ्यूट या त्यांच्या वाद्यांचं वादन, तसंच संगीत संयोजक अशी महत्त्वाची भूमिका निभावल्यामुळे त्यांच्याकडे बहुमुल्य आठवणी होत्या. ते आपलं स्वतःचं मत दिलखुलासपणे मांडत असत. अगदी बिनधास्त! ते अगदी परखडपणे बोलत असत... (मग समोर आमिर खान असो! शाहरूख असो, सलमान असो की चक्क देव आनंद!) ते सांगायचे.. 'ओ. पी.' हे एक अजब रसायन होतं. ते स्वतः नोटेशन काढत नसत. परंतु अमुक गाण्यामध्ये, त्यांची नेमकी थॉट/संकल्पना काय आहे, हे संयोजक 'सॅबी' अंकलना ते सविस्तरपणे सांगायचे. 'सॅबी अंकल' त्या गाण्याशी संबंधित वादकांची स्वतःच्या संकल्पनेनुसार वेगवेगळी 'सेक्शन्स'

बनवायचे. 'व्हायोलिन-व्हिओला-चेलो सेक्शन', 'गिटार- मेंडोलिन वगैरेसह स्ट्रोक्स सेक्शन', 'सॅक्सोफोन-ट्रंम्पेटसह-ट्रंबोन-सुप्रानो-क्लॅरोनेट व फ्ल्युट सेक्शन', 'रिदम सेक्शन' असे विभाग बनवायचे.. त्या प्रत्येक विभागाचा 'म्युझिक-कंडक्टर' या नात्याने एकेक प्रमुख असायचा. हाच त्या गाण्याच्या चलनाचा अभ्यास करून त्याचं 'नोटेशन' लिहून काढायचा. ओपी साहेबांच्या 'म्युझिक-अरेंजमेट' बाबतीतल्या काही महत्त्वाच्या गोष्टी मी नक्कीच सांगू इच्छितो.. त्यांच्या 'वाद्यवृंदामध्ये' एक अत्यंत महत्त्वाचं वाद्य असायचंच! काय ? तर 'व्हायब्रोफोन'! आपल्या 'वाद्यवृंदामधील' प्रत्येक वाद्य हे 'व्हायब्रोफोन' नुसारच 'ट्यून' केलं जावं, असा त्यांचा हट्ट आणि आग्रह असे. (आपल्या संगीत क्षेत्रात 'व्हायब्रोफोनचं ट्यूनिंग' हे 'परफेक्ट' मानलं जातं. कारण.. हार्मोनियम, तानपुरा किंवा तत्सम.. बेसिक 'सूर' देणारी काही संगीतवाद्ये यांचं 'ट्यूनिंग' कदाचित धोका देऊ शकतं.. (मी हे स्वतःच्या 'म्युझिक-प्लॅनेट' या अकादमीमध्ये अनुभवलंय बरं!) तर 'व्हायब्रोफोन' महत्त्वाचा! सगळी वाद्ये 'ट्यून' झाल्यानंतर त्या 'व्हायब्रोफोनवादकाचं' पुढे गाण्यामध्ये नेमकं काम काय? तो तर झोपी जाईल, नाही का? ओपींनी यावरही विचार केलेला होता बरं! त्या गाण्यात 'व्हायब्रोफोनवादकाचं' सुद्धा काहीतरी, पण ठळकपणे जाणवेल योगदान हवंच म्हणून ते म्हणून एक 'गिमिक' करायचे. उदाहरणच सांगायचं तर.. तुम्ही 'यूं तो हमने लाख हसीं देखें है..' हे गाणं निवांतपणे ऐका..! (अंतरा संपताना प्रत्येक 'क्रॉसलाईनला' एक 'व्हायब्रोफोनचा' मस्त 'स्ट्रोक' वाजतो. उदाहरणार्थ.. '..मान के तो देखो कभी किसी का कहाँ..' या शब्दानंतर येणारा तो 'व्हायब्रोफोनचा' एक 'टण्ण!!'.. वातावरण निर्मिती करतो की नाही? ही आठवण.. आमच्या म्युझिक-इंडस्ट्रीतील दिग्गज 'व्हायब्रोफोन वादक' सलीमभाई आणि त्यांचे सख्खे बंधू फारुखभाई यांनी सांगितलीय बरं!

मनोहारी दादा आता 'तुमसा नही देखा' (१९५७) च्या आठवणीत रमले. नामचिन अशा 'फिल्मिस्तान' चे मालक तोलाराम जालन यांनी लेखक नासिर हुसैन यांच्याकडची ती कथा ऐकताच त्यावर सिनेमा बनविण्याची तयारी दर्शवली. शम्मी कपूर, अमीता, प्राण वगैरे स्टारकास्ट ठरली. तोलारामजींनी दिग्दर्शन तुम्हीच करा असं नासिर साहेबांना सांगितलं.. पण संगीतकार म्हणून मला ओपीच हवेत अशी अट घातली. निर्मिती व्यवस्था सांभाळणा-या शशधर मुखर्जी यांनी तीच री ओढली. 'फिल्मिस्तान' या मोठ्या बॅनरचा सिनेमा! ओपी यांना त्या काळातलं सर्वात जास्त.. म्हणजे चक्क 'दीड लाख रूपये' मानधन देऊन करारबद्ध करण्यात आलं. (त्या काळातले 'दीड लाख रूपये'?! बाप रे!! १९५६-५७ मध्ये एक तोळे (२४ कॅरेट) सोन्याचा भाव रू. ९१/- होता, म्हणजे समजून जा!) 'सरपर टोपी लाल, हाथ में..' चं रेकॉर्डिंग रविवारी झालं. वादक मंडळींमध्ये कुरबुर सुरू झाली होती. कारण रविवारी बँका बंद असल्याने आर्थिक व्यवहार जवळजवळ होतच नसत. ओपींना हे समजलं. त्यांनी नासिर हुसैन आणि जालनसाहेबांना अडचण सांगितली. एखाद्याची 'दिलदारी' पहा! जालनसाहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या घरून पैसे मागवले होते.

आणखी एक आठवण तुमच्याबरोबर शेअर करावी म्हणून सांगतो. १९८६-८७च्या दरम्यान पाकिस्तानी व तथाकथित संगीत-संयोजक व की-बोर्ड वाल्यांनी 'झंकार-बीटस्' नावाचा ढिंच्याक प्रकार आणलेला. सतत 'नवे नवे मज

नित्य हवे' अशा रसिकांसाठी ही पर्वणीच ठरली. फारच प्रभावित झाले ते. पाकिस्तानहून आलेल्या या कन्सेप्टने इथल्या म्युझिक कंपन्यांवरही गारूड केलं. त्या काळात या पायरसी कॅसेटस्‌चा चांगलाच खप होत असे. ती लागण नंतर भानामती लागल्यासारखी सगळीकडे पसरली. गाणी कुठलीही असोत, ती 'नॉर्मल स्टाईल'ने आणि नंतर 'झंकार-बीटस्'सह देण्याची फॅशनच आलेली जणू. ढिंऽऽच्याक 'ऑक्टो पॅड' वाजवणारे कमअस्सल वादकही गब्बर झाले. त्यांच्या दारात महागड्या गाड्या आल्या. कीर्तन, प्रवचन वगळता सगळ्या गोष्टी 'झंकार-बीटस्'! नंतर 'बाली सागू' नामक अवलियाने १९९५च्या दरम्यान पहिला 'रीमिक्स' अल्बम मार्केटला टाकला. त्याच्या संकल्पनेत आकाराला आलेली ही जादुगरी सर्वांनीच वाखाणली. त्यातलं 'चुरा लिया है तुमने जो दिल को..' (यादों की बारात) किती गाजलं होतं आठवतंय ना! बरं! 'हॅरी आनंद' हे नाव आठवतं? तेच, जे नाव नंतर 'काटा लगा..'च्या रीमिक्सने चिक्कार गाजलं. त्याने 'रीमिक्स' करायला सुरुवात केली ती १९९६ साली. पहिला अल्बम केला तो आमच्याकडे! त्यावेळी ओ.पी.नय्यरजींच्या गाण्यांचं रीमिक्स करायचा 'फतवा' काढलेला माझ्या बॉसने. मी ओ.पी. नय्यरजींच्या 'ऱ्हिदम ओरिएन्टेड' गाण्यांचं संपूर्ण कलेक्शन मिळवलं. गाणी एकामागोमाग एक ऐकत चाळणी मारण्याचं काम सुरू केलं. अल्बमसाठी आवश्यक होती केवळ दहा गाणी. मात्र जी सुपरहिट असतील तीच निवडायची.. असा संकेत होता. गाणी ऐकणं सुरू केलं खरं पण चांगलीच दमछाक झाली. कुबेराच्या खजिन्यातून नेमका मौल्यवान नग कसा काय निवडायचा हो! सगळीच गाणी जबरदस्त! शंभर नंबरी! हे घ्यावं की ते घ्यावं अशी हालत! ओ.पी.नय्यर ही काय चीज आहे ते मला इथे लक्षात आलं. मी मोजून पन्नास गाणी निवडली! दिली पाठवून बॉसकडे! जिनियस बॉस 'श्री. चंपकजींनी' त्यातून दहा गाणी निवडली. आम्ही कामाला लागलो. या गाण्यांचं 'की-बोर्ड प्रोग्रॅमिंग' करताना रात्र-रात्र जागलो. तहान-भूक हरपून काम चालायचं. संगीत-संयोजक जगदीश लालवानी, सलीम-सुलेमान होते. किती अचंबित करणारे धक्के अनुभवलेत म्हणून सांगू? नोटेशन काढताना संगीत संयोजकांचेही हात थबकायचे, तर.. मी थक्क व्हायचो. बऱ्याच चाली या सारख्याच वाटायच्या! मागील पानावरून पुढे चालू या हिशेबात! पण प्रत्येकातील सतार, तारशहनाई, बासरी, संतूर, पियानो व काही सारंगीचे पिसेस अशा खुबीने पेरलेले आढळले की यंव! त्यांच्या संगीत संयोजनातली आणखी एक गोष्ट आम्हाला प्रकर्षानं जाणवली. गाणं दोन अंतऱ्याचं असो की चार.. बऱ्याचदा गाण्यातील प्रत्येक अंतऱ्यांमधलं म्युझिक ते एकचएक ठेवायचे. गाणं सुरुवातीपासून शेवटापर्यंत ऐकताना त्या गाण्यातला एकच एक मूड कायम रहायला हवा, म्हणे! मधलं व्हेरिएशन जर्की वाटतं, भरकटतो ऐकणारा! (क्या बात है हुजूर!!) हे प्रकरण मला 'म्युझिक इन्चार्ज' म्हणून हाताळताना, खूप अभ्यासायला मिळालं. जुहू चौपाटी वगळता टांग्यांचं दर्शनही हल्ली दुर्लभ झालंय खरं पण ओपींची 'जरा हौले हौले चलो..', 'ओ यारों की तमन्ना है..', 'लाखो है निगाह में..', 'आँखो में कयामत के..', 'माँग के साथ तुम्हारा..' अशी टिपिकल गाणी पायांना ठेका द्यायला मजबूर करतात. ('ओ.पी. नय्यर' यांची 'कराओके'ची ही 'प्ले-लिस्ट्'.) ओपींच्या या टिपिकल ठेक्याचा 'इम्पॅक्ट' इतका जबरदस्त आहे की आजच्या तुषार भाटियासारख्या नवोदित संगीतकारालाही 'ये रात और ये दूरी..' या 'अंदाज अपना अपना' (१९९५) या गाण्यासह इतर

गाणी कंपोज करताना थेट ओपींच्या स्टाईलचा वापर करण्याचा मोह आवरता आलेला नाही. आणखी एक गंमत सांगतो. 'वो कौन थी?' (१९६४) हा सिनेमा संगीतकार मदन मोहनजींनी संगीतबध्द केलाय हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे की नाही? ओके! या सिनेमात लतादीदींनी गायलेली गाणी आहेत. 'छोडकर तेरे प्यार का दामन..' (गायक महेंद्र कपूर, लता) हे युगलगीत, तर इतर गाणी पाहता 'जो हमने दास्तां अपनी सुनायी..' तसेच 'नैना बरसे रिमझिम..' आणि 'लग जा गले के फिर ये..' ही लतादीदींची तिन्ही गाणी मस्तच जमून आलीत. आशाताईंचं 'शोख़ नजर की बिजलियाँ..' हे याच चित्रपटातलं बरं! या गाण्याची ट्रीटमेंट मदनमोहनजींनी इतकी वेगळ्या धाटणीची दिलीय की एचएमव्हीसारख्या मातब्बर कंपनीने आगा-पिछा न पाहता त्या गाण्याचा अंतर्भाव तेव्हा चक्क 'आशा सिंग्ज फॉर ओ.पी. नय्यर' या यादीत केला होता. कळस म्हणजे ती 'एम्पीथ्री' कित्येक वर्षे दिमाखात विकत होते. बऱ्याच जणांना ते आजही ओ.पी नय्यरजींचंच वाटतं. ('मेरा साया' मधलं 'झुमका गीरा रे..' हे गाणं जसं प्रथमदर्शनी संगीतकार मदनमोहनजींचं वाटत नाही तसाच प्रकार म्हणायचा हा! असो! 'आवाज दे के हमें तुम..' (प्रोफेसर) या शंकर-जयकिशनजींच्या गाण्यात तसेच 'जा रे जा रे उड जा रे पंछी..' (माया) या सलिलदांच्या गाण्यात मनोहारीदादांनी (मनोहारी सिंह, पंचमदांचे संगीत संयोजक) जशी सॅक्सोफोनची किमया साधलीय, तशीच किमया त्यांनी ओपींच्या 'है दुनिया उसी की..', 'आओ हुजूर तुमको..', 'यही वो जगहा है..', 'ये है रेशमी जुल्फों का..', 'तारीफ करूँ क्या उसकी..', 'मैं प्यार का राही हूँ..' अशा अनेक गाण्यांतून साधलीय. ओपीने 'बेकसी हदसे गुजर जाए..' (सारंगी), 'मेरी जान तुम पे सदके..' (सतार), 'पिया पिया ना लागे मोरा जिया..' (बासरी) अशा कित्येक गाण्यांतून हिन्दुस्थानी वाद्यांचा बेमिसाल उपयोग करून घेतला आहे. सिनेमातला सुरुवातीपासूनचा ट्रेण्ड पाहता विनोदवीराचं पात्र म्हणजे खरंतर स्टोरी-लाईनमध्ये थोडासा रिलिफ असावा म्हणून घुसडलं जायचं. या कमी महत्त्वाच्या कॅरॅक्टरसाठी पूर्ण लांबीचं गाणं करायचं हा पायंडा खरंतर ओपी नय्यरजींनीच पाडला असे मनोहारीदादा म्हणाले. कधी कधी तर हीरोंवर चित्रित झालेल्या काही गाण्यांपेक्षा ही कॉमेडियनवर पिक्चराईज झालेली गाणी जास्त कॅची वाटायची असं म्हणतात. जॉनी वॉकरवर चित्रित झालेली 'जाने कहाँ मेरा जिगर..' (मिस्टर अँड मिसेस ५५), 'ऐ दिल है मुश्किल है जीना यहाँ..' (सी.आय.डी., १९५६), 'मैं बम्बई का बाबू, नाम मेरा..' (नया दौर, १९५७) ही गाणी आठवतात ना?

ओपी यांच्या कॅम्पमध्ये जिनियस अशा वादकांची फौज होती. यासोबतच जी. एस. कोहली, केरसी लॉर्ड, तर कधी शामरावजी कांबळे यांच्यासारखे सहायक आणि सॅबेस्टियन (सॅबी अंकल) असे संगीत संयोजक म्हणून ओपीसाहेबांना लाभले. यामुळेच की काय त्यांचं संगीत रसरशीत बनलं, यात शंकाच नाही. ओपीची गाणं 'टेक' करण्याची पध्दत वेगळी होती. आधी रिहर्सल्स करून मगच गाणं रेकॉर्ड केलं जात असे. दहा वाजता काम सुरु होऊन दोनेक तास रिहर्सल केली जायची आणि नंतर लगेचच 'टेक' व्हायचा. आठ-नऊ तास 'टेक-रीटेक' घेत रखडपट्टी झाल्याचं कुणाच्याच ऐकिवात नाही. त्यांच्या रेकॉर्डिंगसाठी त्या त्या निर्मात्यांना.. वादकांना 'ओव्हरटाईम' देण्याची कधीच  वेळ आली नाही. सगळं शिस्तबद्ध! ओपीचं रेकॉर्डिंग असलं की वेळ पाळणं सर्वांनाच बंधनकारक असायचं. स्टुडिओत वेळेवर पोहोचावंच लागे. ओपीसाहेब

अमुक वेळेनंतर स्टुडिओच्या दरवाज्याला चक्क आतून कडी लावायला सांगायचे. मग काय बिशाद आहे कुणी आत येण्याची? त्यानंतर कुठलाही मोठा नामचीन वादक असो की माईचा लाल असो, आत येण्यास धजावत नसे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सन्माननीय वादक ज्यांच्या नावापुढे आज पंडित उपाधी लावली जाते, ज्यांचं नाव घेताच आपला हात आपसूकच कानाच्या पाळीकडे जातो अशा वादकांनाही त्याकाळी हाच नियम लागू होता, हे विशेष. त्यांना एकेकदा 'लेट लतिफ' म्हणून उलट पावली परतावं लागलं होतं असं मनोहारी दादांनी सांगितलं. (बापSSरे!) वाचनात आलेली ती नावं सांगू? कारण ही नावं आता 'गुगलवर' वायरल झालीत. म्हणून हिम्मत करतोय. पं. राम नारायणजी (सारंगी), उस्ताद रईस खान (सतार), पं. हरिप्रसादजी चौरसिया (बासरी)!

ओपी नय्यरजी 'शास्त्रीय संगीत' ना शिकले होते ना कुणी गुरू केला होता, पण असं शास्त्रशुध्द शिक्षण घेतलेलं नसूनही बरीचशी रागदारी गाणीही दिलेली आढळतात. 'तू चोरबाजारातून इंग्लिश रेकॉर्डस् आणून उचलेगिरी करतोस.. शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी कंपोज करायची हिम्मत आहे तुझ्यात?!..' अशा शेरेबाजीला उत्तर म्हणून ओपीने काय करावं? भारतभूषण, मधुबाला असलेल्या 'फागून' (१९५८) मध्ये सगळीच्या सगळी गाणी एकाच 'पिलू' रागात कंपोज केली. प्रत्येक गाण्याचा मूड वेगळा, चलन वेगळं. 'एक परदेसी मेरा..', 'सून जा पुकार..', 'पियाSSपिया ना लागे मोरा जिया..', 'तूम रूठ के मत जाना..', 'बरसो रे..', 'मैं सोया अखियाँ मिचे..', 'बना दे, बना दे प्रभुजी..' ही गाणी ऐकताना माझ्यासारखा सामान्य ओळखू शकेल ती एकाच रागात आहेत म्हणून? 'फागून' वगळता त्यांची 'अकेली हूँ मैं, पिया आSS..', 'छोटा सा बालमा..', 'तू है मेरा प्रेमदेवता.', 'जादूगर साँवरीया..', 'देखो बिजली डोले..', 'मन मोरा बावरा..' (पडद्यावर हीरो म्हणून किशोरदा, तर त्याला आवाज रफींचा!) अशी अनेक गाणी शास्त्रीय संगीतावरच तर आधारित होती. राज कपूरसाठी मुकेश किंवा कधी कधी मन्नादा असायचे ना? 'दो उस्ताद' (१९५९) मध्ये ओपी नय्यरजींनी त्याच्यासाठी चक्क महंमद रफीच वापरला. (नोंद : नौशादजींनी 'अंदाज' (१९४९) या सिनेमात दिलीपसाठी मुकेश आणि राज कपूरसाठी रफीचा आवाज वापरला होता हं!) ओपी नय्यरजी स्वभावाने काहीसे हट्टी किंवा आग्रही आहेत. 'तुमसा नही देखा' (१९५७)मध्ये 'जवानियाँ ये मस्त मस्त बिन पिये..', 'सरपर टोपी लाल हाथ में..', 'देखो कसम से..', 'यूँ तो हमने लाख..' अशी फर्मास गाणी देऊनही त्यांच्या हट्टी स्वभावाने परेशान होऊन नासिर हुसेनसाहेबांनी १९५९चा 'दिल देके देखो' सरळ ओपींना ज्युनियर असलेल्या उषा खन्नाकडे सोपवला. 'यार चुलबुला है..', 'बडे है दिल के काले..', 'दिल देके देखो जी..' अशी गाणी गाजली खरी पण उषाने प्रत्येक गाणं ओपी स्टाईलनेच दिलंय. 'यात डायरेक्टरची चलाखी होती म्हणायची की, ओपीने पडद्याआडून मदत केली असेल?..' अशी चौकशी करता बुजुर्ग वादक.. गालात हसून दोन्ही कान पकडतात. हट्टी व आग्रही स्वभावामुळेच की काय ओपींचा कोणत्याच निर्मात्याकडे कायमचा घरोबा असा झाला नाही, हे मात्र नक्की!. राज कपूरच्या कँपमध्ये शंकर-जयकिशन तंबू टाकून होते. चोप्रांकडे संगीतकार रवी. चेतन आनंदकडे मदनमोहन, देव आनंदच्या नवकेतनमध्ये सचिनदा असा एकंदर मामला होता. पण ओपी नय्यर अमुक एक बॅनरसाठीच कायमचे

संगीतकार असं कधीच घडलं नाही. का कुणास ठाऊक पण त्यांना बिगबजेट फिल्मही म्हणाव्या इतक्या मिळाल्या नाहीत. 'नया दौर' मध्ये दिलीपकुमार, 'आरपार' इत्यादीतून गुरूदत्त, 'दो उस्ताद' मध्ये राज कपूर तर 'सी.आय.डी.' पुरता देव आनंद! 'काश्मिर की कली', 'तुमसा नही देखा', 'हम सब चोर है', 'मिस कोका कोला' इत्यादी मधला शम्मी कपूर. बस्स! गाजलेले हीरो मिळालेले सिनेमे हे एवढेच. ओपींना विश्वजीत, जॉय मुखर्जी अशा चालसे टाईप हीरोंचेच अधिक सिनेमे करायला मिळाले. चांगल्या हीरोंपैकी म्हणावं तर जितेंद्र, संजीवकुमार, शशी कपूर कधी वाट्याला आलेच नाहीत. सुपरस्टार म्हणून राजगद्दीवर बसलेला राजेश खन्ना आणि नंतर नावाजला जाणारा अमिताभही मिळाला नाही. नायिकांपैकी म्हणावं तर रेखा वगळता हेमा मालिनी, राखी, जीनत अमान मिळालीच नाही. असो! बहारदार संगीत देण्याबद्दल ख्यातकीर्त असूनही बडे बॅनर्स, बडे दिग्दर्शक, गीतकार ओपींबरोबर काम करायला तितकेसे उत्सुक नसायचे. साहीर लुधियानवींनी तर त्यांच्याबरोबर काम करायचं चक्क नाकारलं होतं. मजरूह सुल्तानपुरी सुध्दा तीन-चार वर्षातच फारकत घेते झाले. ओपीने मग एस. एच. बिहारी, शेवान रिझवी, नूर देवासी, अजीज कश्मिरी अशा होनहार कवी-गीतकारांना हाताशी धरलं होतं. त्यांनी एकूण पंच्याहत्तर चित्रपट संगीतबद्ध केले आहेत आणि काही म्युझिक अल्बम त्यांच्या नावावर आहेत. (संपूर्ण 'फिल्मोग्राफी' यू-ट्युबच्या लिंक्ससह सोबत देतोय. जरूर आस्वाद घ्या!) यातौल जवळजवळ नव्वद टक्के सिनेमातलं संगीत गाजलं. पण अभ्यासकांच्या मते त्यात सातत्य नव्हतं. काही वेळा खूप काम तर काही काळ कामच नाही, अशी परिस्थितीही यायची. ओपी हे आपल्या पद्धतीने काम करणारे शैलीदार संगीतकार होते, त्यामुळे त्यांच्या शैलीला साजेसे चित्रपट नसले तर त्यांना कोण घेणार? उदाहरण सांगायचं तर गुन्हेगारी चित्रपटांची लाट काहीशी ओसरल्यावर गुरूदत्तने 'प्यासा' (१९५७) साठी सचिनदेव बर्मन यांना तर 'चौदहवी का चाँद' (१९६०) साठी संगीतकार रवी यांना पाचारण केलंच होतं ना! 'बहारे फिर भी आएगी' (१९६६) साठी मात्र त्यांनी ओपीच घेतले होते, हे विशेष! ओपी नय्यर या अवलियाने आपली रत्नमंडीत कारकिर्द, स्वमेहनतीने आकाराला आणली खरी, पण त्या यशात सुईच्या टोकावर मावेल एवढीही 'लता मंगेशकर' नाहीय. लतादीदींशी त्यांचं भांडण झालं होतं किंवा काय हे ते दोघंच जाणोत पण त्यांनी स्वरसम्राज्ञी असलेल्या 'लता मंगेशकर' शिवाय आपली कारकीर्द यशस्वी करून दाखवली, हे विशेष! लतादीदींच्या नावाने देण्यात येणारा पुरस्कारही त्यांनी नाकारला. का? तर त्यांनी तत्कालीन ज्येष्ठ पत्रकारांना चक्क तोंडावर परखडपणे सांगितलेलं.. 'पहिली गोष्ट ही, की एखादा 'पुरस्कार' हा एखाद्या सन्माननीय 'दिवंगत' व्यक्तिच्या नावाने दिला जातो. आपल्या सन्माननीय लतादीदी तर हयात आहेत. त्या शतायुषी होवोत, हीच सदिच्छा! दुसरं हे, की त्यांच्याबरोबर मी कधीच काम केलेलं नाहीय! मग त्यांच्या नावाने मला पुरस्कार कशाला? (काय संबंध!?) आणखी एक महत्त्वाचं सांगायचं तर.. या 'पुरस्कारबद्दल' बोलायचं तर, हा पुरस्कार.. एखाद्या गायकाच्या नावाने एका 'संगीतकाराला' प्रदान केला जातोय. आम्ही संगीतकार गाणं बनवून.. गायकांना पेश करत असतो.. तेव्हा गायकाच्या नावाने, एखाद्या संगीतकाराने 'पुरस्कार' घेणं मला तरी उचित वाटत नाही.. एखाद्या 'संगीतकाराच्या' नावाने पुरस्कार असता, तर मी तो स्वीकारलाही असता. दहा हजारांचीच गोष्ट

असली तर कुणी मंत्रीमहोदय ती कधीच सोडत नाहीत.. हा तर 'एक लाख रुपयांचा पुरस्कार आहे..!' पण.. स्पष्ट सांगायचं तर.. मला त्या रकमेबद्दल अजिबात आसक्ती नाहीय.. आणि गरज तर अजिबात नाही.. मी सुखी आणि समाधानी आहे!' असं बेधडक विधानही केलं होतं हे वाचनात आलंय! ओपींच्या गाण्यात रोंबा-सोंबा किंवा चीपनेस कधीच नसायची. 'बहोत शुक्रिया बडी मेहेरबानी..', 'दीवाना हुआ बादल..', 'इशारों इशारों मे ..', 'रोका कयी बार मैने..' अशी रोमँटिक युगलगीतं आशाताईंच्या आवाजाचं लेणं घेऊन आली. 'मेरी निंदो में तुम..' (नया अंदाज -१९५६) असं एखादं किशोरकुमार-शमशादचं युगलगीतही मनाचा ठाव घेऊन गेलं. त्यांच्या गाण्यात लतादीदी नाही ही कायम रुखरुख लागली ती तुम्हां-आम्हाला. ते त्याच गोष्टीला 'क्वालिफिकेशन' समजून ऐटीत जगले! लताशिवाय संगीत करून दाखवणारा एकही असू नये? मग तो मीच का नको? असं त्यांचं स्वच्छ मत होतं. त्यांनी आशाताई, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिकांच्या जोरावर आपली कारकीर्द यशस्वी करून दाखवली. पुरुष गायकांमध्ये महंमद रफी त्यांचा फार लाडका होता. पण त्यांनी महेंद्र कपूर बरोबरही आवडीनं काम केलं. खरंखोटं परमेश्वराला माहीत पण 'रफीसाहेबांशी त्यांचं खटकलं होतं.. वो सब बकवास है..' असं ते म्हणाले. केवळ निर्माता-दिग्दर्शकाच्या सांगण्यावरून 'एक बार मुस्कुरा दो..' (१९७२) मधली गाणी करताना त्यांनी किशोरकुमार व मुकेशला झुकतं माप दिलं. किशोरबरोबर बऱ्याचदा काम करायला मिळालं पण त्याच्याबरोबर सूर तितकेसे जुळले नाहीत आणि मुकेश तर आपण चवीपुरताच वापरला हे मात्र त्यांनी प्रांजळपणे कबूल केलं. कवी प्रदीपजींच्या आग्रहाखातर त्यांनी 'संबंध' (१९६९) या सिनेमातील 'चल अकेला चला अकेला..' या अतिशय भावूक अशा थिमॅटिक साँगसाठी मुकेशचा प्रथमच वापर केला होता याची आठवण मात्र त्यांनी मनःपूर्वक सांगितली. आशा आणि ओपी ही स्वर-सुरांची जोडी बरीच मोठी इनिंग खेळली. 'मन मोरे गा रे झूम के..' या 'मंगू' (१९५४)च्या गाण्यापासून जमलेली ही जोडी 'चैन से हमको कभी..' या 'प्राण जाए पर वचन न जाए' (१९७४) पर्यंत अबाधित होती. नंतर त्यांच्यात खटकलं वगैरे लोकापवाद उठले असतील पण त्यात काही तथ्य नव्हतं असं आपण म्हणायला काय हरकत आहे?

ओपी साहेबांची फिल्मोग्राफी अभ्यासलीत तर सत्तरच्या दशकातील 'एक बार मुस्कुरा दो' (१९७२) ठळकपणे आठवतोय. दुर्दैवाने त्यांचा हा शेवटचा सुपर-हिट संगीत असलेला सिनेमा! 'प्राण जाए पर वचन न जाए' (१९७४) मध्ये आशाताई 'चैन से हमको कभी..' गायल्यानंतर ओपी कॅम्पमधून बाहेर पडल्या. जणू ओपी संपला.. अशा बातम्या/लेख प्रकाशित होऊ लागले. 'प्राण जाए पर वचन न जाए' (१९७४) चा एक किस्सा वाचनात आला होता. ज्येष्ठ लेखकांनी यावर, त्या काळी ऊहापोह केला होता. ३० मार्च, १९७५! 'फिल्मफेअर' चा २२वा पुरस्कार सोहळा! या सोहळयात १९७४ या वर्षात प्रदर्शित झालेल्या हिंदी चित्रपटातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कलावंतांना 'फिल्मफेअरची ट्रॉफी' देऊन गौरविण्यात येणार होतं. १९७४ साली हिंदी चित्रपट संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी उत्कृष्ठ संगीतकार, गीतकार, पुरुष गायक, स्त्री गायिका अशी 'नॉमिनेशन्स' जाहीर होत होती. त्यानंतर एकेक पुरस्कार जाहीर होत होते. गायिका आशाताईंना चार 'नॉमिनेशन्स' होती तर सुमनताईंचं एक! आणि तो क्षण आला. आशाताईंचं नाव जाहीर झालं..


'चैन से हमको कभी..' या गाण्यासाठी. परंतु 'ट्रॉफी' स्वीकारण्यासाठी आशाताई रंगमंचावर आल्याच नाहीत. (माझ्या वाचनात आल्याप्रमाणे सांगायचं तर.. हे एस.एच. बिहारी यांनी लिहिलेलं आणि आशाताईंनी गायलेलं गाणं नोव्हेंबर, १९७३ मध्ये 'रेडिओ-सिलोन' वर वाजवलं गेलं होतं. ते लवकरच 'पिक्चराईज' होईल असं रसिकांना वाटलं होतं. पण ते 'शूट' झालंच नाही.. का?) ही 'फिल्मफेअरची ट्रॉफी' ओपी साहेबांनी स्वीकारली होती खरी, परंतु वाटेत 'हाजी-अली' दर्गा जवळ येताच गाडी थांबवली. गाडीत मागच्या सीटवर ठेवलेली ती 'ट्रॉफी' काढली आणि चक्क समुद्रात फेकून दिली!' (आशाताई आणि ओपीसाहेब यांच्यात अबोला होता, कबुल! पण त्यांच्याबद्दल अत्यंत आदर असल्याने नम्रपणे सांगतोय. यात या दोघांचाही दोष नसावा. एकतर हे इतकं सुंदर गाणं सिनेमात का घेतलं गेलं नव्हतं? जर ते त्या सिनेमात नव्हतंच.. तर त्याचा पारितोषिकासाठी विचार का म्हणून केला गेला? हीच दोघांची मानसिकता असावी.. असं मला तरी वाटतं. याचं उत्तर या सिनेमाचे 'लेखक/दिग्दर्शक एस. अली रझा'च देऊ शकले असते. ओपीसाहेब माझ्या अनेकदा समोर यायचे. परंतु त्यांच्याबद्दल अत्यंत आदर असल्याने त्यांना थेट विचारण्याची माझ्यात तरी हिम्मत नव्हती. बाय द वे! हे आशाताईंनी ओपीसाहेबांकडे गायलेलं ते शेवटचं गाणं होतं.


ओपी ऐटीत राहिले. गाणीही ऐटीत दिली आणि जगलेही ऐटीतच. त्या काळातली 'कॅडिलॅक' नामक कार ही सिनेजगतात फक्त दोघांकडेच होती. व्ही. शांतारामजी आणि ओपीसाहेब! ताठ कण्याचं आयुष्य जगणाऱ्या ओपींचा घात खरंतर याच ऐटीमुळे झालाय असं बुजुर्ग वादक/संयोजक सांगत. फडतूस हीरो, फडतूस दिग्दर्शक, फडतूस निर्माते अशांमुळे त्यांची कलाकीर्द १९७४ नंतर जवळजवळ घसरणीलाच लागली. त्यांची गाणी फडतूस नसायची पण हमखास उताणी पडणाऱ्या पिक्चरला नुसती चांगली गाणी काय कप्पाळ तारून नेणार? ओपीतला चार्म संपला असा गवगवा झाला. तोपावेतो आशाताईही कॅम्प सोडून गेली होती. १९७३ सालानंतर म्हणजेच अमिताभच्या आगमनासरशी सिनेमातून संगीतच हद्दपार होऊ लागलं होतं. डायलॉगबाजीने पडदा व्यापलेला. सगळेच संगीतकार हबकले होते. दुष्काळात तेरावा महिना म्हणावं असं भप्पी लाहिरी नावाचं वादळ घोंगावत होतं. ('एल. पी., आर. डी. सकट सगळेच परेशान होते तर इतरांची काय कथा?..' असं मनोहारीदादांनीही सांगितलं.) ओपींनी शेवटी मगजमारी नको म्हणून घरी बसणंच पत्करलं. हल्ली त्यांनी आमच्या कंपनीत म्युझिक राईटस् असलेले 'निश्चय' (१९९२), 'जिद' (१९९४) तर 'मंगनी' (१९९२) नामक सिनेमांना संगीतबध्द करून नवीन इनिंग खेळायचं ठरवलं. या काळात ओपींनी वाणी जयराम, पुष्पा पागधरे, उत्तरा केळकर, कृष्णा कल्ले, दिलराज कौर, माधुरी जोगळेकर, रंजना जोगळेकर, कविता कृष्णमूर्ती यांना घेऊन सामोरे आले. पण ते नवी 'आशा' बनवू शकले नाहीत. लोकांनी त्यांचं ते पुनरागमन फारसं मनावर घेतलंच नाही. कारण त्या गाण्यांमध्ये त्यांच्या कानात अत्तराच्या फायाप्रमाणे जपून ठेवलेला ओपी नव्हताच. ओपी एकटे झाल्याचं स्पष्टपणे जाणवत होतं. चर्चगेट-मरिन लाईन्सच्या परिसरातील त्यांच्या त्या आलिशान ऐसपैस फ्लॅटमध्ये त्यांची बायको-मुलं (बायको, तीन मुली आणि एक मुलगा) राहत होती पण त्या जागेत ओपींना अजिबात स्थान नव्हतं. (काहीतरी कुटुंब कलह होता म्हणे!) मध्यंतरी त्यामुळेच

त्यांना विरारला येऊन रहावं लागलं होतं. हा लेख प्रसिध्द झाल्यानंतर म्हणजे जानेवारी, १९९६नंतर ते आज दिल्ली, उद्या हैदराबाद असे स्थळबदल करताहेत असं कानावर येत होतं. वयाच्या सत्तरीत त्यांना स्वतःच्या हक्काचं छत्र नसावं याशिवाय दुसरा दैवदुर्विलास कोणता? चित्रपट निर्मात्यांनी पाठ फिरवली, गीतकारांनी टाळलं, घरच्यांनी टाकलं तरी ओपींवर प्रत्येक रसिक प्रेमच करत राहिला. ओपी नय्यरजींनी खूपच पूण्यकर्म केली असावीत म्हणून या काळात त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले ते गर्जेंद्र सिंह (सारेगामा फेम) आणि अहमद वसी. या दोन व्यक्तींनी त्यांना कशाचीच ददात पडू दिली नाही. काही वर्षे ते आपल्या नौपाडा-ठाणे येथील 'नाखवा' नामक एका मित्राकडे मुक्कामाला होते. त्या कुदुंबानेही त्यांना आपल्या पित्यासमान सन्मान देत त्यांचं उर्वरित आयुष्य आनंददायी केलं. या सर्व व्यक्तींमुळेंच संस्थान खालसा झालेला हा मेलडी-किंग शेवटच्या श्वासापर्यंत जगला तो शहेनशाहच्याच रुबाबात. असं म्हणतात की ओपींचा वृध्दापकाळ असताना ते नेहमी सांगायचे की 'माझा मृत्यू झाल्यानंतर माझे कलेवरच काय, क्रियाकर्मालाही माझ्या बायको-मुलांना बोलवू नका..' हे वाक्य ऐकणाऱ्याची काय हालत होत असेल तुम्हीच विचार करा. मित्रपरिवारासोबत १६ जानेवारीला आपला ८१वा वाढदिवस मजेत साजरा करणारे ओपी नय्यरजी अवघ्या काही दिवसांनंतर रविवार दिनांक २८ जानेवारी, २००७ रोजी 'हार्ट अटॅक'ने वारले असल्याची मनहूस खबर येऊन थडकली. सगळीकडे ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. त्यांच्या मित्रपरिवारासह अनेक लोक या मेलडी-किंगच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. याप्रसंगी लतादीदी, बी.आर. चोप्राजी, शम्मी कपूर, शर्मिला टागोर, मुमताज, महेश भट्ट, खय्यामजी, शक्ती सामंत, रवींद्र जैनसाहेब, अनू मलिक इत्यादी दिग्गजांनी त्यांना यथोचित श्रध्दांजली वाहिली. त्यांचे कुटुंबिय त्यांना विसरले पण रसिकांच्या मनात आजही त्यांनी दिलेल्या गाण्यांचा नजराणा मोगऱ्यासारखा टवटवीत राहणार आहे. आजही कोणत्याही स्टुडिओत फिल्म रेकॉर्डिंग असताना 'ऑन -द-स्पॉट' पेमेंट घेणारे वादक पाहिले की ओपी नय्यरजी हमखास आठवतात. एखादा बुजुर्ग वादक मग त्यांच्याबद्दल भरभरून बोलतो. त्यांचा प्रांजळ पण शिस्तप्रिय स्वभाव, नेमकेपणाचा हव्यास, प्रयोगशिलता! सतार, संतूर आणि बासरीवर कोण असायचे ती नावं ऐकताच आपण थक्क होतो. ओपीसाहेबांनी अशा दिग्गजांच्या साथीनं सगळा माहौल आपल्या वेगळ्या ठेक्यांनी समृध्द केलेला दौर आठवतो. 'कभी आर कभी पार लागा तीरे नजर..' या गाण्यानं सुनहरा समा सुरु झाल्याची नांदी देत 'चैन से हमको कभी..' पर्यंतचा प्रवास अनुभवला आहे आपण. स्वरसम्राज्ञी 'लता' आपल्या संगीतात न वापरुनही आपली कलाकीर्द रत्नमंडित करणाऱ्या ओपींना हात उंचावून सलाम!

**© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)**
**anantpavaskar@gmail.com (9820022417)**

<u>संगीतकार ‘ओ.पी.नय्यर’ यांचे चित्रपट.. फक्त फोटोवर ‘क्लिक’ करा.</u>






















GURU DUTT FILM'S
Mr. & Mrs. 55
मि. एण्ड मिसेस ५५
Music : O. P. Nayyar



Danny Films
Miss Coca Cola
Director: Kedar Kapoor
Music : O. P. Nayyar



Sadiq Productions Limited
MUSAFIR KHANA
Director & Producer: M Sadiq
Music : O. P. Nayyar



SABSE
BADA
RUPAIYA
Music : O. P. Nayyar



Bhagam Bhag
Music : O. P. Nayyar


CHHOO MANTAR
Sadiq Productions Ltd.
CHHOO MANTAR
Music: O. P. Nayyar
Lyrics: Jan Nisar Akhtar


C.I.D.
Music : O. P. Nayyar



DHAKE
KI
MALMAL
Music : O. P. Nayyar



HAM SAB
CHOR HAIN
Music : O. P. Nayyar



SHEIKH MUKHTAR'S
MR. LAMBU
TALLMAN
O. P. NAYYER
N. A. ANSARI



NAYA
ANDAZ
Music : O. P. Nayyar


Sippy Films Ltd.
SHRIMATI
420
MEENA SHOREY-JOHNY WALKER-OM PRAKASH
G.P. SIPPY
O.P. NAYYAR



shemaroo
Bade Sarkar
MUSIC : O. P. NAYYAR



QAIDI
Music : O. P. Nayyar



ASHOK - ANJALI
the
story
of
a
kid
who
was
made
Criminal
by
his
own
father......
USTAD
उस्ताद



JOHNNY
WALKER
Music : O. P. Nayyar


SADIQ PRODUCTIONS (PRIVATE) LTD. PRESENT
JOHNNY WALKER
M. SADIQ
O.P.NAYYAR
दुनिया रंग रंगीली
DUNIYA RANG RANGEELI



Mai
Baap
Music : O. P. Nayyar


MAN VS MACHINE
नया दौर
Naya Daur
Music : O. P. Nayyar


TUMSA
NAHI
DEKHA
NASIR HUSSAIN
Music : O. P. Nayyar



बारह बजे
12 O'CLOCK
Music : O. P. Nayyar



फरिश्ता
MUSIC: O. P. NAYYAR



ASHOK KUMAR & MADHUBALA
IN
HOWRAH BRIDGE
MUSIC: O. P. NAYYAR



Kabhi Andhera
Kabhi Ujala
MUSIC: O. P. NAYYAR



Mr. QARTOON M.A
MEHMOOD
JOHNNY WALKER
SHYAMA
MUSIC: O. P. NAYYAR



Kashyap Production Presents
Eagle Films
Mujrim
(B/W)
Starring :
Shammi Kapoor, Ragini,
Johnny Walker & etc



Phagun
MUSIC : O. P. NAYYAR


RAAGINI
MUSIC: O. P. NAYYAR


FILM INDIA CORP.
Sone ki
Chidiya


SHEIKH MUKHTAR PRODUCTIONS
DO USTAD
(HINDI FILM)
Produced By : SHEIKH MUKHTAR
Directed By : TARA HARISH
Music : O.P. NAIYYAR


S.P. PICTURES PRESENT
JAALI
NOTE
Music : O. P. Nayyar



KALPANA
Music : O. P. Nayyar



BASANT
बसंत
MUSIC: O.P.NAYYAR



MITTI ME SONA
Music : O. P. Nayyar



HONG KONG
Music : O. P. Nayyar


EK MUSAFIR
EK HASINA
Music : O. P. Nayyar



PHIR WOHI
DIL LAYA HOON
Music : O. P. Nayyar



Kashmir
ki Kali
Music : O. P. Nayyar
SHAMMI KAPOOR
PRAN
SHARMILA TAGORE


Mere
Sanam



akalmand
Music : O. P. Nayyar



Baharen
Phir bhi Aayegi



DO DILON
KI DASTAN
Music : O. P. Nayyar



Love
And
Murder
Music : O. P. Nayyar



MOHABBAT
ZINDAGI HAI
JAGDISH NIRULA
O.P. NAYYA



Sawan ki
Ghata
Music : O. P. Nayyar


YEH
RAAT
PHIR NA
AAYGI
Music : O. P. Nayyar



C.I.D.
909
Music : O. P. Nayyar



नसीहत
DARA SINGH
RAJSHRI
DEEDAR MOVIES
Nasihat
OM PATWAR
O.P.NAYYAR



Humsaya
music : O. P. NAYYAR


ASHOK KUMAR
JOY MUKERJI
SHARMILA TAGORE
BELA BOSE
K.N.SINGH
NAZIR HUSSAIN
JOHNNY WALKER
Dil aur Mohabbat
VINOD SHAH & HARISH SHAH
ANAND DATTA
O.P.NAYYAR



Kahin Din Kahin Raat
Music : O. P. Nayyar



ultra
Kismat
Music : O. P. Nayyar



SHRIMANJI
MUSIC: OP NAYYAR
LYRICS: AZIZ KASHMIRI



SAMBANDH
Music : O. P. Nayyar



EK BAR MOOSKURA DO
Music : O. P. Nayyar



M·H. FILMS Present
TAXI DRIVER
MOHD HUSSAIN O.P. NAYYAR
EASTMANCOLOR



RATAN MOHAN'S
KHOON KAA BADLA KHOON
खून का बदला खून
RATAN MOHAN · K.PERVEZE · O.P.NAYYAR


DARASINGH · HELEN
AJIT · BELA BOSE
SHEIKH MUKHTAR
हम सब कातिल हैं
THE Killers
A.V.MOHAN'S
MARUTI
O.P.NAYYAR


R.M. Art Productions
PRAN JAYE PAR VACHAN NA JAYE
Music : O. P. Nayyar



HEERA · MOTI
Music : O. P. Nayyar



AiSA BHi HOTA HAi
Music : O. P. Nayyar


Nishchaiy
Music : O. P. Nayyar


MANGNI
Music : O. P. Nayyar


रतन मोहन
बिन माँ के बच्चे


MUQADDAR KI BAAT
Music : O. P. Nayyar


ZID


Remembering
MELODY KING
O. P. NAYYAR

## संगीतकार ‘ओ.पी.नय्यर’ यांची ‘आठवणीतील गाणी’ - ‘यू-टयुब’ वरून उपलब्ध झालेल्या या ‘प्ले-लिस्टस्’

**१. ओ.पी.नय्यर साहेब यांच्या ‘फिल्मोग्राफी’ नुसार विविध ‘प्ले-लिस्टस्’**

**https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95_wop6rYC8BsBQ3cDZy-vq&si=2XBMSnHiwlOg7dUq**

**२. ओ.पी.नय्यर साहेब यांच्या ‘सुपर-हिट’ गाण्यांची ‘प्ले-लिस्ट’**

**https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi9512wz1o4LXjHhLhxY4du3h&si=5IDiaowRxjYPsCM8**

**https://youtube.com/playlist?list=PL1-leYLI0tYsBTW59E7rPfE4v-wV4e0c-&si=M6RDZXDzpv78cmkJ**

**३. ओ.पी.नय्यर साहेब यांच्या गाण्यांचे ‘कराओके ट्रॅक्स’ - ‘प्ले-लिस्टस्’**

**https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96ZJRJbqoXGwERo6qYiOUMN&si=GZdfg9ZRZboqW4S6**

**४. ओ.पी.नय्यर साहेब यांची ‘सुपर-हिट’ गाणी गाण्याचा, मी केलेला एक प्रयत्न - ‘प्ले-लिस्ट’**

**https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi9784smU7dd_HH4OGzd1VisL&si=h_jUah_jgjleNTXU**

**© - संकलन : अनंत पावसकर (पत्रकार व संगीत संयोजक)**
**anantpavaskar@gmail.com**


shemaroo
Together Forever
O.P.Nayyar
& Asha Bhosle


shemaroo
~ TOGETHER FOREVER ~
O.P. NAYYAR
& ASHA BHOSLE


♥

Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com

For ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com © - ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’


‘अनंत पावसकर’ यांची प्रकाशित झालेली ही काही‘ई-बुक्स’.. फक्त ‘क्लिक’ करा..























500
भारत INDIA
ओ. पी. नय्यर
O. P. NAYYAR
2013

♥